No-02/1K/A/34/ A-246

A-246

4 NOV 2003

24345

III-C

7264
5/11/03

क्रमांक : एलसीएस २६१४/१३८३/प्र.क्र. ५६२९ /ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- ३१.१०.२००३

प्रति,

डॉ. सुनिल देशमुख , विधानसभा सदस्य,
मुख्यप्रवर्तक ,
आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था.
आशिर्वाद ,रुक्मीणी नगर , अमरावती.

**विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
मौजे आंबिवली , स.नं. १४१ अ , नभूक्र. ८३३ (भाग )
भूखंड क्रमांक-३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र.३ ई
आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था ( आमदारांची )
यांना मंजूर करणेबाबत.

महोदय,

वरील विषयाबाबतच्या आपण मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य , मंत्रालय, मुंबई-३२ यांना सादर केलेल्या दिनांक- १६ जुलै २००३ च्या पत्राच्या संदर्भात असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, मौजे आंबिवली , स.नं. १४१ अ , नभूक्र. ८३३ (भाग )भूखंड क्रमांक-३ च्या अभिन्यासास मुंबई महानगरपालिकेने मान्यता दिल्यानुसार भूखंड क्रमांक- ३ ई .साठी अनुज्ञेय असलेला रस्त्याचा व इतर अनुज्ञेय चटईक्षेत्र मिळून सुमारे एकुण ८,२९६.३१ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड पुढे नमूद केलेल्या बाबीची पूर्तता करण्याच्या अटीवर त्याचप्रमाणे यथावकाश शासन ठरवील त्या अटी व शर्तीवर कब्जेहक्काची किंमत आकारुन आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था ( आमदारांची ) यांना सोबतच्या जोडपत्र "एक" मध्ये दर्शविलेल्या तिच्या सदस्यांच्या सदनिका बांधण्याकरीता मंजूर करण्याचा शासनाचा हेतू आहे :-

१)संस्थेच्या सदस्यांबाबतची सविस्तर माहिती व शपथपत्रे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे हे पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत सादर करावे. त्यामध्ये प्रत्येक सदस्यांचे अर्जाकडे काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र समाविष्ट करण्यात यावे.

२)शासनाच्या दिनांक ९-७-१९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ नुसार संस्थेचे सदस्य हे त्यांच्या कुटूंबाच्या मासिक उत्पन्नाच्या आधारे चटई क्षेत्राच्या सदनिका मिळण्यास पात्र असतील आणि त्याकरीता त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कब्जेहक्काची रक्कम आकारण्यात येईल.

३)संस्थेच्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या २०% सदस्य हे अनुसुचित जाती / जमातीचे/ विमुक्त व भटक्या जमातीचे असले पाहीजे.

४)संस्थेच्या सदस्यांच्या अर्हतेविषयीच्या अटी सोबतच्या जोडपत्र (अ) व (ब) मध्ये दर्शविलेल्या आहेत. त्या अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक असतील तसे लेखी हमीपत्र संस्थेला द्यावे लागेल.

५)संस्थेच्या सदस्यांची मासिक कौटुंबिक उत्पन्नाविषयीची आवश्यक ती प्रमाणपत्रे संस्थेने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना सादर करावीत. संस्थेच्या सदस्यांनी त्यांच्या मासिक उत्पन्नाविषयीचे त्यांच्या नियोक्त्यांचे (Employer) प्रमाणपत्रे देणे आवश्यक राहील.

६)संस्थेच्या सदस्यांनी ते सध्या रहात असलेल्या जागेच्या क्षेत्राबाबत त्या जागेच्या मालकांच्या किंवा संस्थेच्या भाडेपावत्या तसेच महाराष्ट्रातील १५ वर्षे वास्तव्य दर्शविणारे पुरावे / प्रमाणपत्रे इत्यादि माहिती संस्थेने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे सादर करावी.

२. वरीलप्रमाणे संस्थेच्या सर्व सदस्यांची परिपूर्ण माहिती व शपथपत्रे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे संस्थेने सदर पत्र मिळाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर केले पाहिजेत. अन्यथा हे पत्र

phn Suva
letter
Accordingly to
society
5/11

आपोआपच रद्द होईल. संस्थेने सादर केलेल्या माहितीची जरुर तर प्रत्येक सदस्यांच्या राहण्याच्या/कार्यालयाच्या/नोकरीच्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष तपासणीद्वारे छाननी करून तत्संबंधीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा शासनास सादर करतील व त्यानंतर जमीन मंजूरीबाबतचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात येतील.

आपला,

( विजय पाचकवडे )
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रतिलिपी माहिती व त्वरीत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१
२) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
३) जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, मुंबई उपनगर जिल्हा वांद्रे.

२. संस्थेने सदस्यांची माहिती उपलब्ध केल्यावर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलसीएस १०९५/प्र.क्र. ३७/ज-१, दि. १ जुलै, १९९९ तसेच शासनपूरक पत्र दिनांक ८.१.२००१ व १०.२.२००१ मधील आदेशानुसार त्या माहितीची जरुरीनुसार सदस्यांच्या राहण्याच्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेट देऊन छाननी करावी व आवश्यक तो प्रस्ताव शासनास एक महिन्याच्या आत सादर करावा ही विनंती.

(विजय पाचकवडे)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

**सोबत :-** १) सभासदांची यादी "जोडपत्र एक"
२) जोडपत्र "अ" व "ब"

(3)

**शासन पत्र क्रमांक एलसीएस-२६१४ /१३८३ /प्र.क्र. ५६२१ /ज-३ दि. ३१.१०.२००३ सोबतचे**

**जोडपत्र एक**

| **अ.क्र.** | **सभासदाचे नांव** | |
|---|---|---|
| १ | डॉ.सुनील पंजाबराव देशमुख | आमदार |
| २ | श्री.सुरेश शेट्टी | राज्यमंत्री |
| ३ | श्री.रणजित कांबळे | आमदार |
| ४ | श्री.कैलास गोरंट्याल | आमदार |
| ५ | श्री. सुबोध बाबुराव मोहीते | केंद्रीय मंत्री |
| ६ | श्री.सुधीर श्रीवास्तव | सचिव (वित्त विभाग ) |
| ७ | श्री.नरेशचंद्र ठाकरे | आमदार |
| ८ | श्रीमती चित्कला झुत्शी | प्रधान सचिव ( वित्त विभाग ) |

( विजय पाचकवडे )
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

(३५७)

क्रमांक: एलसीएस २६०४ /प्र.क्र.१८९८ / ज-३
**महसूल व वन विभाग,**
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- २४ ऑगस्ट २००४

**विषय :-** जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे आंबीवली , स.नं. १४१ अ ,नभूक्र. ८३३ भाग, भूखंड
क्रमांक ३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र. ३ इ ,आर्शिवाद
सहकारी गृहनिर्माण संस्थेस मंजूर करण्याबाबत

**ज्ञापनः-**

उपरोक्त विषयासंबंधी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या क्रमांक- ०२ १४१ अ /२ क /एफ-२४६ ,दि. १९.४.२००४ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, मौजे आंबीवली , स.नं. १४१ अ ,नभूक्र. ८३३ भाग, भूखंड क्रमांक ३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र. ३ इ , अनुज्ञेय असलेला रस्त्याचा व इतर अनुज्ञेय घटक्षेत्र मिळून सुमारे ४३९६.२१ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड आर्शिवाद सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित ) या संस्थेस मंजूर करण्याचा शासनाचा हेतू असल्याबाबत क्रमांक- एलसीएस २६९४ /१३८३ /प्र.क्र. ५६२९ /ज-३, दि.३१.१०.२००३ चे हेतूपत्र संस्थेस दिल्यानंतर संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या सभासदांच्या माहितीच्या आधारे सभासदांना मान्यता देणे आणि जमीन अंतिमतः मंजूर करण्याच्या संस्थेच्या मागण्यांबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

अ) संस्थेने प्रस्तावित केलेल्या १७ सभासदांबाबत संस्थेने जिल्हाधिका-यांमार्फत सादर केलेली माहिती विचारात घेऊन सदर १७ सभासद शासन निर्णय,दि.९.७.१९९९ मधील तरतुदीनुसार पात्रतेचे निकष पूर्ण करीत असल्याने त्यांच्या सभासदत्वास खालील अटीस अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. सदर १७ पात्र सभासदांची यादी **परिशिष्ट अ** मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**अट :-१) सदर १७ सभासदांवर शासन पूरक पत्र क्रमांक-एलसीएस १०९५ /प्र.क्र. ३७ / ९५ /ज-१, दि.८.१.२००१ व दि.१०.२.२००१ मधील अटी बंधनकारक राहतील.**

**२)२० टक्के मागासवर्गीय सभासद असणेबाबतची तरतूद प्रस्तुत प्रकरणी पूर्ण होत नाही. ( ३ एवजी फक्त २ सभासद मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत ) तरी १७ सभासदांना २० टक्के मागासवर्गीय सभासदांचा कोटा पूर्ण करण्याच्या अटीस अधीन राहून मान्यता देण्यात यावी.संस्थेकडे शिल्लक रहाणा-या क्षेत्राकरीता नवीन सभासद समाविष्ट करताना शासन निर्णय दि.९.७.१९९९मधील तरतूदीनुसार २० टक्के मागासवर्गीय सभासदांचा कोटा पूर्ण करणे संस्थेवर बंधनकारक राहील.**

**३) संस्थेच्या पात्र सभासदांना त्यांच्या उत्पन्न गटानुसार अनुज्ञेय क्षेत्रफळाची सदनिका देय राहील.**

**४)श्रीमती भाग्यश्री हर्षवर्धन पाटील यांच्या उत्पन्नाबाबत तहसिलदार इंदापूर यांचा दाखला सादर करण्याच्या अटीस अधीन राहून त्यांच्या सभासदत्वास**

30 AUG 2004
18258

ब) संस्थेस मंजूर करावयाच्या मौजे आंबिवली, स.नं. १४१ अ, नभूक्र. ८३३ (भाग )भूखंड क्रमांक-३ च्या अभिन्यासास मुंबई महानगरपालिकेने मान्यता दिल्यानुसार भूखंड क्रमांक- ३ ई ,साठी अनुज्ञेय असलेला रस्त्याचा व इतर अनुज्ञेय चटईक्षेत्र मिळून सुमारे एकूण ४,२९६.३१ चौ.मी. क्षेत्राकरीता दि.१.१.२००४ रोजीच्या शिघ्रसिध्द गणकानुसार येणा-या प्र.चौ.मी. रु. २५,८००/- या तात्पुरत्या दराने संस्थेतील सभासदांच्या उत्पन्न गटानुसार येणारी सवलतीची कब्जेहक्काची किंमत वसूल करुन नेहमीच्या अटी व शर्तीवर खालील अटीवर मंजूर करण्यास हरकत नसावी.

**अट :- प्रश्नाधीन जमिनीचे मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाचे अंतीम मुल्यांकन सहाय्यक संचालक नगररचना यांजकडून निश्चित करुन घेऊन त्यानुसार येणारी अंतीम कब्जेहक्काची किंमत व तात्पुरती किंमत या मधील फरकाची रक्कम विहीत व्याजासह वसूल करावे व तशा आशयाचे लेखी हमीपत्र संस्थेकडून घेण्यात यावे.**

क)संस्थेच्या मुख्यप्रवर्तकानी दि.२२.८.२००४ च्या पत्राद्वारे नवीन २७ सदस्यांची नावे दिली असून त्यांचा समावेश संस्थेमध्ये करण्याबाबत विनंती केली आहे. सदर २७ सदस्यांची नावे **परिशिष्ट ब** मध्ये दर्शविण्यात आली आहेत. या २७ सदस्यांची आवश्यक माहिती , प्रतिज्ञापत्र मुख्यप्रवर्तकांनी जिल्हाधिका-यांकडे दोन महिन्यात सादर करावी. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिका-यांनी त्या सदस्यांची पात्रता नियमानुसार तपासून त्यांच्या सदस्यत्वाबाबत निर्णय घ्यावा .

२. हे शासन वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्र. ५८५ / ०४ / व्यय-९, दिनांक २८.६.२००४ ) निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शिवाजी पाटणकर )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

सोबत- परिशिष्ट-अ ( मान्यताप्राप्त सभासदांची यादी)
परिशिष्ट-ब ( संस्थेने नव्याने सूचविलेल्या सभासदांची यादी )

पात्र २७ सभासदांची मूळ प्रतिज्ञापत्रे

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.
प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

**प्रतिलिपी :-**

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त, व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
६) सहाय्यक संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा
७) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
८) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
९) ज-३ कार्यासन (निवड नस्ती) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

शासन ज्ञापन क्रमांक- एलसीएस २६०४ /प्र.क्र. १८९८ /ज-३ दि.२४.८.२००४ सोबतची पात्र सभासदांची यादी.

**परिशिष्ट -अ**

| अ.क्र. | पात्र सभासदाचे नाव |
| --- | --- |
| १ | डॉ. सुनील देशमुख |
| २ | श्री.वसंत पुरके |
| ३ | श्री. सुरेश शेट्टी |
| ४ | श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक निंबाळकर |
| ५ | श्री. सुबोध बाबूराव मोहीते |
| ६ | श्री.कैलास किसनराव गोरंट्याल |
| ७ | श्री. संजय वा . देवताळे |
| ८ | श्री. सुदर्शन भगवानराव निमकर |
| ९ | श्री. नरेशचंद्र पंजाबराव ठाकरे |
| १० | श्री. अनिलकुमार गंगाधर अहेर |
| ११ | श्रीमती भाग्यश्री हर्षवर्धन पाटील |
| १२ | श्री. जयंत मुरलीधर ससाणे |
| १३ | श्री. रणजीत प्रताप कांबळे |
| १४ | श्रीमती चित्कला झुत्सी |
| १५ | श्री. सुधीरकुमार जयनारायण श्रीवास्तव |
| १६ | श्री. नितीन काशिनाथ [illegible] |
| १७ | श्री. एन. अरमुगम |

(शिवाजी पाटणकर)
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

दु. nr. ५ .

शासन ज्ञापन क्रमांक- एलसीएस २६०४ /प्र.क्र. १८९८ /ज-३ दि.२४.८.२००४ सोबतची नवीन सभासदांची यादी.

## परिशिष्ट -ब

| अ.क्र. | नवीन सभासदाचे नाव |
|---|---|
| १ | श्री. संजय उत्तमराव देशमुख |
| २ | श्री. वसंतराव सुर्यवंशी |
| ३ | श्री. दिंगबरराव मुरलीधर बागल |
| ४ | श्री. वसंतराव इटकेलवार |
| ५ | श्री. धर्मराव भगवंतराव अत्राम |
| ६ | डॉ. दशरथ मोतीराम भांडे |
| ७ | श्री. रामदास मणीराम बोडखे |
| ८ | श्री. अजितराव शंकरराव घोरपडे |
| ९ | श्री. विनायकराव किसनराव जाधव |
| १० | डॉ. (श्रीमती विमल मुंदडा ) |
| ११ | श्रीमती सुधा जोशी |
| १२ | श्रीमती रंजना सुभाष कुल |
| १३ | श्रीमती कल्पना रमेश नरहिरे |
| १४ | श्री. चंद्रकांत छाजेड |
| १५ | श्री. एकनाथराव खडसे |
| १६ | श्री. किर्ती गांधी |
| १७ | श्री. बाबूराव चर्तुभूज |
| १८ | श्री. दौलतराव पवार |
| १९ | श्री. राधाकृष्ण विखे पाटील |
| २० | श्री. विजय उर्फ बाळासाहेब थोरात |
| २१ | श्री. जे.एच. भाटीया |
| २२ | श्री. महेश पाठक |
| २३ | श्री. सु.वि. सोडल |
| २४ | श्रीमती शर्वरी गोखले |
| २५ | श्रीमती अंना दाणी |
| २६ | श्री. उल्हास निकम |
| २७ | श्री. विजयकुमार |

( शिवाजी पाटणकर )
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

(39)

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१
Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com

क्र. :-सी/०२/१४१अ/इक्र/एफ-२४६
दिनांक :- २(/३/२००५.

**वाचले :-**

१) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलसीएस-२६०४/प्रक्र.१८९८/ज-३, दिनांक २४/८/२००४.

२) या कार्यालयाचे समक्रमांकाचे दिनांक १०/३/२००५ चे पत्र.

३) आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेकडील दिनांक २४/३/२००५ चे पत्र.

**आदेश :-**

उदेशिकेतील अ.क्र.१ कडे नमूद केलेल्या शासन ज्ञापनान्वये मौजे आंबिवली येथील स.क्र. १४१अ मधील भूखंड क्र.३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र.३ई, क्षेत्र ३,४७५.६४चौ.मी. क्षेत्राचा भूखंड आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्थेस मंजूर केलेला आहे. तथापि, मुंबई महानगर पालिकेने मंजूर केलेल्या अभिन्यासानुसार भूखंड क्र.३ई चे क्षेत्र ३,४७५.६४चौ.मी. व रस्त्याचा व इतर अनुज्ञेय अतिरिक्त चटई क्षेत्र ८२०.६७चौ.मी. मिळून एकूण ४,२९६.३१चौ.मी. चटईक्षेत्राचा असल्याने मुंबई महानगर पालिकेने मंजूर केलेल्या अभिन्यासानुसार वाढीव क्षेत्रफळासहीत प्रश्नाधीन भूखंड संस्थेस मंजूर करण्यात येत आहे.

संस्थेने जमीनीचे तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम रु.१,९०,००,०००/- (रुपये एक कोटी नव्वद लाख फक्त) या कार्यालयांत भरणा केलेली आहे. जमीनीची अंतिम किंमत जास्त निश्चित झाल्यास फरकाची कब्जेहक्काची रक्कम विहित व्याज दराने भरण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र संस्थेने दिले आहे. प्रश्नाधीन भूखंडाचा करारनामा संस्थेबरोबर करण्यासाठी जी तारीख या कार्यालयांत निश्चित होईल त्या तारखेस संस्थेने करारनाम्यासाठी उपस्थित रहाणे बंधनकारक आहे. संस्थेतील मंजूर सभासदांची यादी सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये जोडलेली आहे. तसेच कार्यालयीन दिनांक १०/३/२००५ च्या पत्रातील अटी संस्थेस बंधनकारक रहातील.

प्रश्नाधीन ४,२९६.३१चौ.मी. चटई क्षेत्राचा भूखंड आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्थेस मंजूर करण्यांत येत आहे. वास्तव जमीनीचा ताबा घेण्यासाठी संस्थेने नगर भूमापन अधिकारी, अंधेरी/तहसिलदार अंधेरी यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

स्थळ प्रतिवर जिल्हाधिकारी यांची सही असे

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता
२०/३/०५.

प्रति,
डॉ. सुनिल देशमुख
मुख्यप्रवर्तक,
आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था,
बंगला क्र.५अ, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई.

30/3/05

3c-1246-3-mrs

**प्रतिलिपी :-**

१) मा. प्रधान सचिव(महसूल), महसूल व वन विभाग यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

२) नगर भूमापन अधिकारी, अंधेरी/तहसिलदार अंधेरी

२/- त्यांना कळविण्यांत येते की, प्रश्नाधीन जमीनीचा ताबा संस्थेस देऊन ताबा पावती, जमीनीचा नकाशा व सुधारीत मिळकतीचा उतारा यासह पुर्तता अहवाल सादर करावा.

स्थळ प्रतिवर जिल्हाधिकारी यांची सही असे

28/3/05

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्ह्याकरीता.

जिल्हाधिकारी, मुं.उ.जि. यांचेकडील आदेश क्र.०२/१४१३अ/६का/एफ-२४६, दिनांक २८/३/२००५ सोबतची पात्र सभासदांची यादी

## परिशिष्ट-अ

| अ.क्र. | पात्र सभासदांचे नांव |
|---|---|
| १ | डॉ. सुनिल देशमुख |
| २ | श्री वसंत पुरके |
| ३ | श्री. सुरेश शेट्टी |
| ४ | श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक निंबाळकर |
| ५ | श्री. सुबोध बाबुराव मोहिते |
| ६ | श्री. कैलास किसनराव गोरंट्याल |
| ७ | श्री. संजय वा. देवताळे |
| ८ | श्री. सुदरशन भगवानराव निमकर |
| ९ | श्री. नरेशचंद्र पंजाबराव ठाकरे |
| १० | श्री. अनिलकुमार गंगाधर महेर |
| ११ | श्रीमती भाग्यश्री हर्षवर्धन पाटील |
| १२ | श्री. जयंत मुरलीधर ससाणे |
| १३ | श्री. रणजित प्रताप कांबळे |
| १४ | श्रीमती चित्रकला झुलसी |
| १५ | श्री. सुधीरकुमार जयनारायण श्रीवास्तव |
| १६ | श्री. नितीन काशिनाथ राऊत |
| १७ | श्री. एन. अरमुगम |
| १८ ते ४८ | रिक्त जागा |

स्थळ प्रतवर जिल्हाधिकारी यांची
सही असे

सही/- २८/३/०५
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा कारिता
२८/३/०५

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com

क्र. :-सी/०२/१४१अ/३क/एफ-२४६
दिनांक :- 2/[illegible]/२००५.

**वाचले :-**

१) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलसीएस-२६०४/प्रक्र.१८९८/ज-३, दिनांक २४/८/२००४.
२) या कार्यालयाकडील समक्रमांकाचा दिनांक २८/३/२००५ चा आदेश.
३) आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेकडील दिनांक १३/४/२००५ चे पत्र.

**पुरवणी आदेश :-**

उद्देशिकेतील अ.क्र.१ कडे नमूद केलेल्या शासन ज्ञापनाच्या अनुषंगाने उद्देशिकेतील अ.क्र.२ अन्वये मौजे आंबिवली येथील स.क्र. १४१अ मधील भूखंड क्र.३ च्या अभिन्यासातील भूखंड मुंबई, क्षेत्र ४,२१६.३१ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्थेस मंजूर केलेला आहे. तसेच १७ सभासदांना मंजूरी देण्यांत आलेली आहे.

आता संस्थेने उद्देशिकेतील अ.क्र.३ अन्वये १४ सभासदांचे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केले आहेत. सदर १४ सभासदांच्या कागदपत्रांची छाननी केली असतां, ते पात्र ठरत असल्यामुळे मंजूर १७ सभासदांलगत खालील १४ सभासदांना मंजूरी देण्यात येत आहे.

| मंजूर यादीतील अ.क्र. | सभासदाचे नांव |
|---|---|
| १८) | श्री. एकनाथराव गणपतराव खडसे. |
| १९) | श्री. विजय उर्फ बाळासाहेब थोरात. |
| २०) | श्री. जगमोहनसिंग एच. भाटीया |
| २१) | श्री. अजीतराव शंकरराव घोरपडे |
| २२) | श्री. धर्मराव भगवंतराव अत्राम (मागासवर्गीय) |
| २३) | श्री. विजय कुमार |
| २४) | श्री. उल्हास नानासाहेब निकम |
| २५) | श्री. महेश पाठक |
| २६) | श्रीमती ॲणा के. दाणी |
| २७) | श्रीमती सुधा विजय जोशी |

| | |
|---|---|
| २८) | श्रीमती शर्वरी गोखले |
| २९) | श्री. संजन उत्तमराव देशमुख |
| ३०) | श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील |

स्वाक्षरित/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता

मूळ प्रतिवर जिल्हाधिकारी यांची सही आहे

प्रति,
डॉ. सुनिल देशमुख
मुख्यप्रवर्तक,
आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था,
बंगला क्र.५अ, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई.

प्रतिलिपी :-
१) मा. प्रधान सचिव(महसूल), महसूल व वन विभाग यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) नगर भूमापन अधिकारी, अंधेरी
३) तहसिलदार अंधेरी

स्वाक्षरित/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

मूळ प्रतिवर जिल्हाधिकारी यांची सही आहे

COLLECTOR OF MUMBAI SUBURBAN DISTRICT

Issued
2/6/05

3c-f246-5-mrs

(1055)

क्रमांक : एलसीएस-२६०९/८८७/प्र.क्र. १७७/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. (877)
दिनांक : १२ एप्रिल, २०१०

जिल्हाधिकारी मुंबई
15 APR 2010
6667

विषय :- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे-आंबिवली, ता.अंधेरी, सर्व्हे क्र.१३१ अ, नभूक्र.८३३ पै, भूखंड क्र.४ च्या सुधारीत अभिन्यासातील भूखंड क्र.३ ई या शासकीय मिळकतीवरील १००% टि.डी.आर. परवानगी मिळणेबाबत तसेच एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्र वाणिज्य वापर करण्यास परवानगी मिळणेबाबत.
आशिर्वाद (१) सहकारी गृहनिर्माण संस्था

ज्ञापन :-

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांच्या क्रमांक मशा/कार्या-२/जमीन-३/कावि-७९८/०९, दिनांक १४.१०.२००९ च्या वरील विषयाबाबतच्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तिपूर्वक कळविण्यात येते की, मौजे-आंबिवली, ता.अंधेरी, सर्व्हे क्र.१४१ अ, नभूक्र.८३३ पै, भूखंड क्र.४ च्या सुधारीत अभिन्यासातील भूखंड क्र.३ ई या शासकीय मिळकतीवरील १००% टि.डी.आर. परवानगी मिळणेबाबत तसेच एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्र वाणिज्य वापर करण्यास परवानगी मिळणेबाबत संस्थेने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदर संस्थेस शासन निर्णय क्रमांक जमीन२६९८/प्र.क्र.७६४/ज-३, दिनांक ९.७.१९९९ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार निवासी प्रयोजनासाठी वापरात येणा-या हस्तांतरणीय विकास हक्क (टि.डी.आर.) करीता सदर जमीनीच्या शिघ्रसिध्दगणकानुसार येणा-या प्रचलित बाजार मुल्य किंमतीच्या २.५ % दराने तात्पुरते अधिमुल्य आकारुन तसेच वाणिज्य प्रयोजनासाठी वापरात येणा-या टि.डी.आर. करीता आवश्यक क्षेत्रावर प्रचलित बाजार मुल्याच्या ५ % दराने तात्पुरते अधिमुल्य आकारुन टि.डी.आर. वापरण्यास तसेच संस्थेस दिनांक १४.६.१९८८ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या तरतुदीनुसार एकूण बांधकाम क्षेत्राच्या कमाल १५ % या प्रमाणात जागेवर वाणिज्यीक वापर करण्यास खालील अटी व शर्तीवर, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना योग्य वाटतील अशा अटी व शर्तीवर व नेहमीच्या अटी व शर्ती वर शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी:-

१) संस्थेस प्रदान केलेल्या जागेवर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय प्रमाणात टि.डी.आर. साठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे रितसर अर्ज करुन विहीत अटी व शर्तीची पुर्तता करुन महानगरपालिकेकडून टि.डी.आर. प्राप्त करुन घ्यावा.
२) टि.डी.आर.चा निवासी तसेच वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापर करताना आकारावयाच्या अधिमुल्याबाबत सुधारीत धोरण शासनाच्या विचाराधीन असून, त्या प्रकरणी भविष्यात जो निर्णय होईल त्यानुसार अधिमुल्याची फरकाची रक्कम विहित व्याजासह वसूल करण्यात येईल व त्यासंबंधात संस्थेकडून रु.२००/- च्या स्टॅम्पपेपर वर लेखी हमीपत्र घेण्यात यावे.
३) टि.डी.आर. अन्वये उपलब्ध होणाऱ्या नविन बांधकामामध्ये तयार होणाऱ्या सदनिकांसाठी घेण्यात येणारे सभासद हे शासन धोरण दि.२५.५.२००१ व दि.२५.७.२००७ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार

(1057)

(865)

पात्र असणे आवश्यक आहे व अशा नवीन सभासदांना जिल्हाधिकारी यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

४) संस्थेने सदर जागेवर टि.डी.आर. वापर करण्यासंदर्भात व त्यानुसार जागेवर बांधकाम करण्यासाठी जागेवरील बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेची पूर्व मान्यता घ्यावी.

५) सदर भूखंडावर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार जागेवर वाणीज्य वापर अनुज्ञेय असल्यास त्यानुसार संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता घेऊन जास्तीत जास्त १५ % वाणीज्य वापर करावा.

६) एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्र अधिक लाभदायी प्रयोजनासाठी मंजूर करताना शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलबीआर-२५८६/ प्र.क्र.२६६/ज-२, दि.७ सप्टेंबर,२००७ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार अतिरिक्त भूईभाडे, हस्तांतरण फी व अनुज्ञप्ती फी संस्थेकडून आकारण्यात यावी.

७) संस्थेने वाणिज्यिक प्रयोजनासाठी तसेच निवासी प्रयोजनाकरीता करावयाच्या बांधकामाचे आराखडे मुंबई महानगरपालिकेकडून मंजूर करुन घ्यावेत. तसेच सदर जागेचा वापर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दिलेल्या तरतुदीनुसार करण्यात यावा.

८) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी या संदर्भात सादर केलेल्या प्रस्तावातील मुद्यांची पुर्तता संस्थेकडून करुन घेण्यात यावी.

२. हे ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**प्रतिलिपी :-**
१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई .
२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई .
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६) सहाय्यक संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा.
७) नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई
८) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई.
९) मुख्य प्रवर्तक, श्री आशिर्वाद (१) सहकारी गृहनिर्माण संस्था
१०) ज-३ कार्यासन (निवड नस्ती) महसूल व वन विभाग.

G-Ashirwad (1)-Ambivali.lwp

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

*प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१*

**दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com**

१०२

११०

**क्रमांक : ०२/१४१अ/३क/एफ-२४६**
**दिनांक : १८/०५/२०१०**

**<u>वाचले</u> :** १) आशिर्वाद (१) सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेकडील दि.१०/७/२००९ चे पत्र.

२) कार्यालयीन सम क्रमांक दि.७/९/२००९ चा शासनास सादर केलेला प्रस्ताव.

३) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलसीएस-२६०९/८८७/प्र.क्र.१७७/ज-३ दि.१२/४/२०१०.

**<u>आदेश :</u>**

शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलसीएस/२६०४/प्र.क्र.११९८/ज-३ दि.२[illegible]/८/२००४ च्या निदेशानुसार इकडील सम क्रमांक दि.२८/३/२००५ च्या आदेशान्वये मौजे आंबिवली, ता.अंधेरी येथील सर्वे क्र.१४१अ, नभूक्र.८३३पै भूखंड क्र. ३ च्या सुधारीत अभिन्यासातील भूखंड क्र.३ई, क्षेत्र ३,४७५.६४ चौ.मी. तसेच रस्त्याचे व इतर अनुज्ञेय अतिरिक्त चटई क्षेत्र ८२०.६७ चौ.मी. मिळुन एकूण ४,२९६.३१ चौ.मी. क्षेत्र आशिर्वाद (१) सहकारी गृहनिर्माण संस्थेस प्रदान करणेत आलेले आहे. सदर संस्थेस भूखंडाचा ताबा दि.६/४/२००५ रोजी सुपूर्द करणेत आलेला आहे. त्याअनुषंगाने नगर भूमापन अधिकारी अंधेरी यांनी विषयांकित मिळकतीचा स्वतंत्र मिळकत पत्रिका उघडण्यात येऊन त्यास नगर भूमापन क्र.८३३/८ हा दिलेला आहे व त्यावर धारक म्हणून सस्थेचे नांव दाखल करण्यात आलेले आहे. सत्ता प्रकार ब-१ नमुद करुन ३,४७५.६० चौ.मी. क्षेत्र कायम केलेले आहे.

आता आशिर्वाद (१) सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी त्यांचेकडील दि.१०/७/२००९ च्या पत्रान्वये खालील परवानग्या मिळणेबाबत या कार्यालयास विनंती केलेली होती.

१) १०० टक्के टिडीआर परवानगीबाबत.
२) एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या १५ टक्के क्षेत्रावर वाणिज्य वापर करणेबाबत.,

उपरोक्त विनंतीच्या अनुषंगाने उपोद्घातातील अ.क्र.२ च्या प्रस्तावान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. त्याअनुषंगाने उपोद्घातातील अ.क्र.३ च्या ज्ञापनान्वये संस्थेस १००% टी.डी.आर. परवानगी तसेच एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या १५% क्षेत्रावर वाणिज्य वापर करणेसासाठी परवानगी त्यांचे अधिमुल्य अदा करण्याच्या विशिष्ट अटीवर आशिर्वाद (१) सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्यात आलेली आहे. परंतु बृहन्मुंबई महानगर पालिकेने मंजुर केलेल्या इमारत आराखडयानुसार संस्थेच्या भूखंडावर निवासी वापराकरीता फक्त ८० चौ.मी. टी.डी.आर. एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्रापैकी फक्त ९७६ चौ.मी. क्षेत्र वाणिज्य प्रयोजनाकरीता वापर करणेस संस्थेने त्यांचेकडील दि.२२/४/२०१० चे पत्रान्वये व त्यासोबतच्या हमी पत्रान्वये या कार्यालयास विनंती केल्यामुळे सदर क्षेत्रांचे अधिमुल्य रक्कम रु.२१,६४,०८०/- व हमीपत्र या कार्यालयास सादर करणेबाबत संस्थेस दि.२८/४/२०१० रोजी कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने संस्थेने त्यांचेकडील दि.५/५/२०१० चे पत्रासोबत रक्कम रु.२१,६४,०८०/- चा डिमांड ड्राफ्ट व हमीपत्र या कार्यालयास सादर केलेले आहे. त्यामुळे आशिर्वाद (१) सहकारी संस्थेस त्यांचे भूखंडावर निवासी वापरासाठी फक्त ८० चापै.मी. टी.डी.आर. व एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या १५% क्षेत्रापैकी फक्त ९७६ चौ.मी. क्षेत्र वाणिज्य प्रयोजनाकरीता वापर करणेस खालील अटी शर्तीवर मंजुर करणेत येत आहे.

**अटी :-**

१) संस्थेस प्रदान केलेल्या जागेवर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय प्रमाणात टि.डी.आर. साठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे रितसरअर्ज करुन विहीत अटी व शर्तीची पुर्तता करुन महानगरपालिकेकडून टि.डी.आर. प्राप्त करुन घ्यावा.

२) टि.डी.आर. चा निवासी तसेच वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापर करताना आकारावयाच्या अधिमुल्याबाबत सुधारीत धोरण शासनाच्या विचाराधीन असुन, त्या प्रकरणी भविष्यात जो निर्णय होईल त्यानुसार अधिमुल्याची फरकाची रक्कम विहित व्याजासह वसूल करण्यात येईल.

३) टि.डी.आर. अन्वये होणाऱ्या नविन बांधकामामध्ये तयार होणाऱ्या सदनिकांसाठी घेण्यात येणारे सभासद हे शासन धोरण दि.२५/५/०७ व दि.२५/७/०७ मध्ये दिलेल्या तरतूदीनुसार पात्र असणे आवश्यक आहे. व अशा नवीन सभासदांना जिल्हाधिकारी यांची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील.

४) संस्थेने सदर जागेवर टि.डी.आर. वापर करण्यासंदर्भात व त्यानुसार जागेवर बांधकाम करण्यासाठी जागेवरील बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेची पूर्व मान्यता घ्यावी.

५) सदर भूखंडावर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतूदीनुसार जागेवर वाणीज्य वापर अनुज्ञेय असल्यास त्यानुसार संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता घेऊन जास्तीत जास्त १५% वाणीज्य वापर करावा.

६) एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्र अधिक लाभादायी प्रयोजनासाठी जागेचा प्रत्यक्ष वापर सुरु झाल्यापासून शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एलबीआर-२५८६/प्र.क्र.२६६/ज-२ दि.७ सप्टेंबर २००७ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार अतिरिक्त भूईभाडे हस्तांतरण फी व अनुज्ञप्ती फी संस्थेस आकारुन वसूल केली जाईल.

७) संस्थेने वाणिज्यिक प्रयोजनासाठी तसेच निवासी प्रयोजनाकरीता करावयाच्या बांधकामाचे आराखडे मुंबई महानगरपालिकेकडून मंजुर करुन घ्यावेत. तसेच सदर जागेचा वापर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दिलेल्या तरतुदीनुसार करण्यात यावा.

आपला विश्वासू,

स्वाक्षरित/-

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

स्वळ प्रातवर जिल्हाधिकारी यांचा सही वरो

प्रति,
सचिव,
अर्शिवाद (१) सहकारी गृहनिर्माण संस्था,
बंगला अ-५, मादम कामा रोड,
मुंबई-३२.

**प्रतिलिपी :-**

१) मा. अपर मुख्य सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

२) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग,कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

Received

3c-ws-502-16-kvb
3